## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शनिवार दि. १३/१/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२२ वी बैठक बुधवार दि.१३.१.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप-सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ४) | श्री. जी.डी.जैस्वाल | सहमुख्य अधिकारी |
| ५) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १६) | मा.श्री.व्ही.जी.नायर. | सदस्य |
| १८) | श्री. अनिल देशमुख,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा.उप-सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या.सचिव श्री. देशमुख्य यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांचे स्वागत करुन मा.उप-सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२२/१**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.०५.१२.२००९ रोजी झालेल्या १२१व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ९ वर सादर करण्यात आले आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी पृ.क्र.२ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संक्रमण शिबीरातील गाळे कोणाला वितरीत केले आहेत त्यांची नांवे व फोटो इ. माहिती ज्याठिकाणी संक्रमण शिबीरात म्हाडाची कार्यालये आहेत अशाठिकाणच्या संक्रमण शिबीरात प्रथम लावण्याबाबत मागील बैठकीत सूचना केली होती. त्याप्रमाणे काय कार्यवाही केली अशी विचारणा केली असता संबंधित उपमुख्य अधिकारी

(सं.गा.) व कार्यकारी अभियंता यांनी पुनर्रचित इमारतीमध्ये तसेच संक्रमण शिबीर ज्याठिकाणी सूचना फलक लावण्यात आलेले आहेत त्याची माहिती अनुपालन अहवालात पृ.क्र.६५ वर दिली आहे असे सांगितले.

मा. सदस्य श्री.किसन बा. जाधव यांनी संक्रमण शिबीरातील गाळयात राहणा-या रहिवाशांची माहिती फलकावर लावण्यात आली आहे ती अतिशय कमी इमारतींची माहिती उपलब्ध आहे असे निदर्शनास आणले तर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे मत व्यक्त केले की, फलकावर काही महिलांचे फोटो लावण्यात आले आहेत ते सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून योग्य नाही असे वाटते. मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी देखिल याविषयी असे सूचित केले की, रहिवाशांचे फोटो न लावता रहिवाशांची नांवे व गाळा क्रमांक लिहिण्यात यावा अशी काही इमारतींच्या रहिवाशांनी विनंती केली आहे. मा.सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी असे निदर्शनास आणले की, जर रहिवाशांचे फोटो असतील तर दलाल / इतर व्यक्ती त्याचा गैरफायदा घेतील म्हणून फोटो न लावता नावांची यादी लावण्यात यावी. यावर मा.उप-सभापती तथा मुख्य अधिकारी यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, मुळ कार्यालयीन रेकार्डवर फोटो उपलब्ध राहतील तसेच मा.सदस्यांनी सुचविल्यानुसार रहिवाशांचे फोटो सूचना फलकावर न लावता रहिवाशांची नांवे व गाळा क्रमांक लिहिण्यात येईल यास सर्व सदस्यांनी संमती दर्शविली. मा. मुख्य अधिकारी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता बैठकीत सर्व उपमुख्य अभियंता यांना निर्देश दिले.

मा. सदस्य श्री.किसन बा. जाधव यांनी लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीसचा नमुना तयार असल्यास तो दाखविण्यात यावा अशी सूचना केली असता लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीसचा नमुना प्रत सर्व सदस्यांना बैठकीत देण्यात आली व मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, व्हेकेशन नोटीस म्हाडा अधिनियम १९७६ मधील कलम ९० (१) व ७७ (बी) खाली देण्यात येतात. त्यामध्ये उद्देश वेगवेगळा असल्याने एकाच रंगाची व्हेकेशन नोटीस न छापता इमारतीच्या दुरुस्तीसाठी व पुनर्रचनेसाठी देण्यात येणा-या व्हेकेशन नोटीसचा रंग वेगवेगळा असेल म्हणजे व्हेकेशन नोटीसच्या रंगावरुन नोटीस दुरुस्तीसाठी म्हणजेच कलम ९० (१) खाली देण्यात आली आहे की पुनर्रचनेसाठी म्हणजे कलम ७७ (बी) खाली देण्यात आली आहे हे कळून येईल. व पुढील बैठकीत व्हेकेशन नोटीसचा अंतिम नमुना दाखविण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार परिपूर्ण लॅमिनेशन व्हेकेशन नोटीस तयार करण्याच्या सूचना मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांना दिल्या. सर्व सन्मा. सदस्यांनी सुधारित व्हेकेशन नोटीस मागील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार नमूना तयार केला व अतिशय उत्कृष्ट पध्दतीने ती तयार केली त्याबाबत मा. मुख्य अधिकारी व त्यांच्या सहका-यांचे अभिनंदन केले.

मा.सदस्य श्री.किसन बा. जाधव यांनी मंडळाच्या दुरुस्ती कामांना महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाकडून स्थगिती देण्यात येते ती योग्य नाही अशाप्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता असे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, या विषयाबाबत उपमुख्य अभियंता यांनी महानगरपलिकेच्या उपायुक्तांशी संपर्क करुन हा प्रश्न सोडविण्याचे ठरले होते तसेच पुन्हा असे प्रकार होऊ नयेत म्हणून मंडळ व म.न.पा. यांच्यात समन्वय राखण्याच्या दृष्टीकोनातून अधूनमधून या विषयाबाबत उपमुख्य अभियंता यांनी महानगरपलिकेच्या उपायुक्तांशी संपर्कात रहावेत अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता मंडळाचे मुख्य लेखाधिकारी यांनी माहिती दिली की, सारस्वत बँकेकडून प्राप्त प्रस्तावानुसार आकारण्यात येणारा प्रति गाळेधारक प्रशासकीय शुल्काबाबतचा फेर प्रस्ताव बँकेमार्फत देण्यात येत असून तो प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. यावर मुख्य अकिारी यांनी अशा सूचना दिल्या की, भाडे जमा करण्यासाठी मंडळाला किती खर्च येतो व बँकेतर्फे भाडे जमा करावयाचे झाल्यास बँकेस कमिशनपोटी करावा लागणारा खर्च किती येईल याचा अभ्यास करुन पुढील बैठकीत माहिती द्यावी

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळाच्या प्रलंबित विषयांबाबत मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांच्याशी लवकरच बैठक ठरवावी. हा विषय प्रलंबित असून त्याबाबत लवकरच बैठक आयोजित करावी अशी सूचना केली.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सामाजिक कार्य करणा-या संस्थांना संक्रमण गाळे वितरीत करण्याबाबत विचारणा केली असता उपमुख्य अधिकारी श्री.बोडखे यांनी असे सांगितले की, अर्ज निकालात काढण्यात येत असून काही संस्थांचे अर्ज बाकी आहेत. याबाबतची माहिती अनुपालन अहवालात दिलेली आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळाच्या लहान लहान गाळयांच्या विक्रीबाबत जाहीरात देण्याचे ठरले होते त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली विचारणा केली असता उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी माहिती दिली की, गाळयांची विक्री किंमत रेडी रेकनरप्रमाणे ठरविण्यात येत आहे व लवकरच जाहीरात प्रसिध्द करण्यात येईल. मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, रेडी रेकनरप्रमाणे गाळयांची किंमत ठरविल्यास १८० चौ.फू.च्या गाळयाची किंमत काही इमारतींमध्ये सुमारे रु.२३ लाख होईल. लहान गाळयांसाठी एवढी मोठी रक्कम भरणे सामान्य जनतेस परवडणारे नाही. म्हणून म्हाडाच्या गाळयांसाठी जसा निवासी गाळयासाठी प्रति चौ.फू.१५००/- रुपये व अनिवासी गाळयासाठी प्रति चौ.फू.३०००/- रुपये दर लावला जातो तो दर लावण्यात यावा अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी

यांनी सूचना केली की, प्रथम रेडी रेकनरप्रमाणे गाळयांच्या किंमती निश्चित करुन जाहीरात द्यावी. त्या जाहीरातीप्रमाणे गाळे विकेले जातील व जे गाळे विकले जाणार नाहीत ते गाळे लिलाव पध्दतीने विकण्यासाठी पर्याय उपलब्ध राहील. ज्याला परवडेल तो गाळा विकत घेईल. हे शक्य नसेल तर सदर गाळे विकण्यासाठी मुंबई मंडळाकडे वर्ग करता येतील.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कलम ३३(७) खाली ना हरकत प्रमाणपत्राव्दारे पुनर्विकसित झालेल्या इमारतीतील अतिरिक्त गाळे बृहतसूचीवरील गाळेधारकांना वितरीत करण्याबाबत काही सूचना केल्या असता मा.मुख्य अधिकारी यांनी या विषयाबाबत प्रस्ताव मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्याकडे विचारार्थ ठेऊन निर्णय घेण्यात येईल. अशी माहिती दिली.

मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, या महिन्यात रे रोड येथे उपकरप्राप्त इमारत कोसळली तेथे कोणतीही जीवितहानी झाली नाही व कोणीही जखमी झाले नाही. सदर प्रसंगी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. जोशी व उप अभियंता श्री.चव्हाण यांनी वेळीच दक्षता घेऊन आवश्यक ती कार्यवाही केली व परिस्थिती उत्तमप्रकारे हाताळल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. मा.सदस्य श्री.सईद खान यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले की, इमारत मोठया प्रमाणात कोसळून देखील मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. जोशी व उप अभियंता श्री.चव्हाण यांच्या प्रयत्नांमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही व कोणीही जखमी झाले नाही तसेच या प्रसंगी तेथील रहिवाशी, पत्रकार व राजकारणी यांना धीराने सामोरे गेले व परिस्थिती चांगलयाप्रकारे हाताळली याबद्दल सर्व सदस्यांच्या वतीने अभिनंदन करुन मुख्य अधिकारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. मा.सदस्य श्री.सईद खान यांनी अशी सूचना केली की, अशा प्रसंगी मंडळाच्या संबंधित स्थानिक कार्यालयातील अधिका-यांना मदत करण्यासाठी आणखी काही अधिका-यांची टीम त्वरित पाठविण्याची व्यवस्था असावी. यावर मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, इतर विभागाच्या अधिका-यांना त्या विभागाची माहिती नसल्यामुळे अशा प्रसंगी त्या त्या विभागाचे संबंधित अधिकारीच चांगल्याप्रकारे काम करु शकतात व त्यांना नियंत्रण कक्षातर्फे मदत केली जाते. तसेच घटनास्थळी मुख्य अधिकारी, उपमुख्य अभियंता, सहमुख्य अधिकारी, उपमुख्य अधिकारी हे अधिकारी देखील त्वरित भेट देत असतात. तसेच अशी घटना फार क्वचितच घडते, तरीसुध्दा स्थानिक अधिका-यांच्या मदतीला अन्य विभागाच्या अधिका-यांची मदत देण्याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---oo---

**बाब क्रमांक १२२/२ परिमंडळ-४ : फ-उत्तर, ग-उत्तर विभाग.**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११ ते १७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परीमंडळ-४ मधील फ-उत्तर, ग-उत्तर विभागातील एकूण १३ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतींची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीकरिता घेण्यासाठी प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२,४२,६६,४७४/- व निव्वळ रक्कम रु.१,३४,४७,०५२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२२ / १०१६**

परीमंडळ-४ मधील फ-उत्तर, ग-उत्तर विभागातील एकूण १३ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु रु.२,४२,६६,४७४/- व निव्वळ रक्कम रु.१,३४,४७,०५२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२२/३ --** परिमंडळ-३: ई-१, ई-२, फ-दक्षिण विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१९ ते ३३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परीमंडळ-३ मधील ई-१, ई-२, फ-दक्षिण विभागातील एकूण ९१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी

करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १४,३२,६४,८२६ /- व निव्वळ रक्कम रु. ७,९३,५१,१०८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२२ / १०१७</u>

परीमंडळ-३ मधील ई-१, ई-२, फ-दक्षिण विभागातील एकूण ९१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु १४,३२,६४,८२६/- व निव्वळ रक्कम रु. ७,९३,५१,१०८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक १२२/४ --</u>** परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३५ ते ५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील एकूण १०० उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१९,१०,५९,५४८/- व निव्वळ रक्कम रु.१०,९७,९५,१७२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२२ / १०१८</u>

परिमंडळ-१ मधील अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील एकूण एकूण १०० उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता

प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१९,१०,५९,५४८/- व निव्वळ रक्कम रु.१०,९७,९५,१७२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२२/५ --** परिमंडळ-२ : डी-१, डी-२, ग-दक्षिण विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५७ ते ६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग-दक्षिण विभागातील एकूण २९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.६,५५,८८,५५४/- व निव्वळ रक्कम रु.३,६२,९०,५७०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२२ / १०१९**

परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग-दक्षिण विभागातील एकूण २९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.६,५५,८८,५५४/- व निव्वळ रक्कम रु.३,६२,९०,५७०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

## आयत्यावेळेचे विषय

---

**बाब क्रमांक १२२/६**

विषय- अनुपालन अहवाल

उपरोक्त अनुपालन अहवाल पृ.क्र.६५ ते ६७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती सर्वानुमते अनुपालन अहवाल मंजूर करण्यात आला.

**बाब क्रमांक १२२/७**

विषय- दुरुस्ती व पुनर्रचना मंडळा अंतर्गत उपकर लागू असलेल्या इमारती / इमारतीचा भाग कोसळून मृत / जखमी व्यक्तींना त्वरीत आर्थिक मदत देण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६९ ते ७१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मागील दहा वर्षात इमारत कोसळून झालेले अपघात पाहता सुमारे ८९ व्यक्ती मृत झालेल्या व २२ व्यक्ती जखमी झालेल्या आढळतात यावरुन सरासरी १० व्यक्ती मयत झाल्याचे गृहित धरल्यास दरवर्षी १० लाख रुपये मृत व्यक्तींसाठी व ५ ते १० लाख रुपये जखमी व्यक्तींसाठी म्हाडातर्फे अनुदानापोटी खर्च होतील. म्हाडातर्फे मृत व जखमी व्यक्तींना आर्थिक मदत करण्यासाठी अंदाजे रु.२५ लाखाच्या निधीची गरज लागेल. सादर केलेल्या प्रस्तावामध्ये उपकरप्राप्त इमारत अथवा तिचा भाग पडून दुर्घटना झाल्यास मयत व्यक्तीच्या वारसास रु.१ लाख, गंभीर जखमी व्यक्तीस रु.१५,०००/- तर किरकोळ जखमी व्यक्तीस रु.५०००/- तांतडीची आर्थिक मदत दि. १.४.२०१० पासून देण्यात यावी असा आहे. तसेच सदर आर्थिक मदतीकरिता रु.२५ लाखाची तरतुद मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी व प्राधिकरणाकडून सदर रक्कम मुं.इ.दु. व पु.मंडळास उपलब्ध करुन देण्यात यावी असा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांनी सर्वानुमते मंजूरी दिली.

**ठराव क्रमांक - १२२/१०२०**

दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत उपकर लागू असलेल्या इमारती/इमारतीचा भाग कोसळून मृत/जखमी व्यक्तींना त्वरित आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेकरीता पाठविण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

<u>बाब क्रमांक - १२२/८</u>

विषय - संक्रमण शिबीरातील गाळयांकरीता आकारण्यात येत असलेल्या भाडयाच्या दरात वाढ करणेबाबत. (उपमुख्य अधिकारी/सं.शि.विभाग)

---

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७३ ते ८५ वर सादर करण्यात आला.

उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली की, सद्यस्थितीत मंडळास सर्व करांपोटी तसेच पाणी बिल कॉमन लाईट बिल, बाहय सुविधा इ.करिता संक्रमण शिबीरातील प्रत्येक गाळयापोटी नफा न मिळविता कमीतकमी रु.१६००/- खर्च येतो. परंतु सेवाशुल्कात एवढी वाढ केल्यास भाडेकरु/रहिवाशी व जनप्रतिनिधी यांचा विरोध होण्याची शक्यता असल्याने असा प्रस्ताव करण्यात आला की, मुंबई व मुंबई उपनगरातील सर्व संक्रमण शिबीरातील गाळयांकरीता दि.०१/०४/१० पासून मासिक सेवाशुल्क रु.१२००/- आकारण्यात यावे. जे उपकरप्राप्त इमारतीमधील मुळ रहिवाशी/भाडेकरु विविध संक्रमण शिबीरात रहात आहेत त्यांना दि.०१/०४/२०१० पासून रु.१२००/- मासिक सेवाशुल्क न आकारता त्यांना मासिक सेवाशुल्क प्रती गाळा रु.६००/- एवढी आकारणी करावी. त्यांचे मासिक सेवा शुल्कात दरवर्षी १ एप्रिल पासून रु.१००/- ची वाढ करण्यात यावी. होणारी वाढ सर्व साधारणपणे निश्चित केलेल्या मासिक सेवाशुल्काच्या दरापर्यंत म्हणजेच रु.१२००/- पर्यंत सिमित/मर्यादित राहिल. जे रहिवाशी/भाडेकरु १ एप्रिल २०१० किंवा तद्नंतर सं.शि.तील गाळयाता ताबा घेतील त्यांचेकडून रु.१२००/- मासिक सेवाशुल्क वसुल करण्यात यावे. संक्रमण शिबीरात सर्व घुसखोर/अनधिकृत वास्तव्य करणा-यांना त्यांना निष्कासिक करेपर्यंत दंडनीय आकार म्हणून दि.०१/०४/२०१० पासून रु.२४००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यास मान्यता मिळावी. एस.आर.ए.विकासक किंवा इतर कोणतेही विकासक/संस्था यांना वेळोवेळी मंडळातर्फे ठराविक मुदतीसाठी गाळे वितरीत करण्यात आले आहेत किंवा वितरीत केले जातील त्यांचेकडून तसेच सं.शि.त स्थलांतरीत केल्यावर त्याच्या मुळ इमारतीस पुनर्विकासाची परवानगी दिलेल्या प्रकरणी दि.०१/०४/२०१० पासून रु.२४००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यात यावे. दर ३ वर्षांनी मासिक सेवाशुल्काचा आढावा घेऊन त्यात आवश्यकतेप्रमाणे वाढ करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होवून सर्व सन्मा.सदस्यांनी सूचविल्याप्रमाणे मुंबई व मुंबई उपनगरातील सर्व संक्रमण शिबीरातील गाळयांकरीता दि.०१/०४/१० पासून मासिक सेवाशुल्क रु.५००/- आकारण्यात यावे. तसेच संक्रमण शिबीरात सर्व घुसखोर/अनधिकृत वास्तव्य करणा-यांना त्यांना निष्कासिक करेपर्यंत दंडनीय आकार म्हणून दि.०१/०४/२०१० पासून रु.३०००/- मासिक सेवाशुल्क आकारावे. एस.आर.ए.विकासक किंवा इतर कोणतेही विकासक/संस्था यांना वेळोवेळी मंडळातर्फे ठराविक मुदतीसाठी गाळे वितरीत करण्यात आले आहेत किंवा वितरीत केले जातील त्यांचेकडून तसेच सं.शि.त स्थलांतरीत केल्यावर त्याच्या मुळ इमारतीस पुनर्विकासाची परवानगी

दिलेल्या प्रकरणी दि.०१/०४/२०१० पासून रु.३०००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यात यावे. दर ३ वर्षांनी मासिक सेवाशुल्काचा आढावा घेऊन त्यात आवश्यकतेप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२२/१०२१**

मुंबई व मुंबई उपनगरातील उपकरप्राप्त इमारतीमधील मुळ भाडेकरुंना तसेच सामाजिक व शैक्षणिक संस्थांना दिलेल्या संक्रमण शिबीरातील प्रत्येक गाळ्याकरिता दि.०१/०४/१० पासून मासिक सेवाशुल्क रु.५००/- आकारण्यात यावे. तसेच संक्रमण शिबीरात अनधिकृत्त वास्तव्य करणा-या सर्व घुसखोर/अपात्र रहिवाशांकडून त्यांना निष्कासिक करेपर्यंत दंडनीय आकार म्हणून दि.०१/०४/२०१० पासून रु.३०००/- मासिक सेवाशुल्क आकारावे. एस.आर.ए.विकासक किंवा इतर कोणतेही विकासक/गृहनिर्माण संस्था यांना वेळोवेळी मंडळातर्फे ठराविक मुदतीसाठी गाळे वितरीत करण्यात आले आहेत किंवा वितरीत केले जातील त्यांचेकडून तसेच उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत केल्यानंतर त्यांच्या मुळ इमारतीस पुनर्विकासाची परवानगी दिलेल्या प्रकरणी दि.०१/०४/२०१० पासून रु.३०००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यात यावे. दर ३ वर्षांनी मासिक सेवाशुल्काचा आढावा घेऊन त्यात आवश्यकतेप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी देण्यात आली

**<u>बाब क्रमांक - १२२.९</u>**

विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-३ मधील ई-१,ई-२, फ/दक्षिण विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास एकूण रक्कम रु.२०.३० लक्ष प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८७ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२२/१०२२**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-३ मधील ई-१,ई-२, फ/दक्षिण विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास एकूण रक्कम रु.२०.३० लक्ष प्रशासकीय मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**<u>बाब क्रमांक - १२२/१०</u>**

विषय - इ.क्र.९६-९८, डालमिया बिल्डींग, टी.एच.कटारीया मार्ग, माटुंगा, मुंबई या इमारतींच्या मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव रक्कम रु. ३,७९,४१७/- इतक्या रक्कमेस प्रचलित मर्यादा रु.२००० प्रती चौ.मी. च्या आधिन राहून मंजूरी देण्याबाबत

---

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८९ ते ९१ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. इ.क्र.९६-९८, डालमिया बिल्डींग, टी.एच.कटारीया मार्ग, माटुंगा, मुंबई या इमारतीस मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक काम असल्याने व येणारा खर्च प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आत येत असल्याने व त्या प्रचलित मर्यादेस (रु.२०००/- प्रती चौ.मी.) भाडेकरुंनी मान्य केल्यामुळे प्रशासकीय मंजूरीवरील वाढीव रु.३,७९,४१७/- रक्कमेस मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१२२/१०२३**

इ.क्र.९६-९८, डालमिया बिल्डींग, टी.एच.कटारीया मार्ग, माटुंगा, मुंबई या इमारतीस मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक काम असल्याने व येणारा खर्च प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आत येत असल्याने व त्या प्रचलित मर्यादेस (रु.२०००/- प्रती चौ.मी.) भाडेकरुंनी मान्य केल्यामुळे प्रशासकीय मंजूरीवरील वाढीव रक्कम रु.३,७९,४१७/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १२२/११**

विषय - इ.क्र.१३०बी,खाडीलकर रोड, मुंबई या इमारतीच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव रक्कम रु. ६०,३४५/- इतक्या रक्कमेस प्रचलित मर्यादा रु.२००० प्रती चौ.मी. च्या आधिन राहून मंजूरी देण्याबाबत

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९३ ते ९५ वर सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१२२/१०२४**

इ.क्र.१३०बी, खाडीलकर रोड, मुंबई या इमारतीस सुधरित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक काम असल्याने व येणारा खर्च प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या आत येत असल्याने व त्या प्रचलित मर्यादेस (रु.२०००/- प्रती चौ.मी.) भाडेकरुंनी मान्य केल्यामुळे प्रशासकीय मंजूरीवरील वाढीव रक्कम रु.६०,३४५/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १२२/१२**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या भाडेकरु/रहिवाश्यांच्या बृहत्सूचीमध्ये समावेश करुन त्यांना गाळा वितरण करण्याबाबत कार्यपध्दती. (उपमुख्य अधिकारी/पु.गा.विभाग)

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.९७ ते १०३ वर सादर करण्यात आला.

सदर परिपत्रक हे आपल्या अवलोकनार्थ बैठकीसमोर ठेवण्यात आले आहे, असे मा.मुख्य अधिकारी, दु.व पु.मंडळ यांनी सांगितले.

<u>बाब क्रमांक - १२२/१३</u>

विषय - भूकर पहाणी क्र.३/५०, परेल शिवडी विभाग, इ.क्र.३ व १२, उपकर क्र.फ द/१०२६ (१) व फद/१०३५ डॉ.बी.ए.रोड,लालबाग, मुंबई-१२ "लोकसत्ता" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१०५ ते १०७ वर सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१२२/१०२५**

भूकर पहाणी क्र.३/५०, परेल शिवडी विभाग, इ.क्र.३ व १२, उपकर क्र.फ द/१०२६ (१) व फद/१०३५ डॉ.बी.ए.रोड,लालबाग, मुंबई-१२ "लोकसत्ता" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**<u>बाब क्रमांक १२२/१४ --</u>** परिमंडळ-३: ई-१, ई-२, फ-दक्षिण विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१०९ ते ११३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परीमंडळ-३ मधील ई-१, ई-२, फ-दक्षिण विभागातील एकूण १३ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. २,३३,९४,४६२ /- व निव्वळ रक्कम रु. १,३७,८८,२७८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२२ / १०२६</u>

परीमंडळ-३ मधील ई-१, ई-२, फ-दक्षिण विभागातील एकूण १३ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२,३३,९४,४६२ /- व निव्वळ रक्कम रु. १,३७,८८,२७८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२२/१५ परिमंडळ-४ : फ-उत्तर, ग-उत्तर विभाग.**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११५ ते १२० वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परीमंडळ-४ मधील फ-उत्तर, ग-उत्तर विभागातील एकूण १४ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतींची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीकरिता घेण्यासाठी प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२,३०,४४,८३५/- व निव्वळ रक्कम रु.१,७४,५६,१३७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२२ / १०२७**

परीमंडळ-४ मधील फ-उत्तर, ग-उत्तर विभागातील एकूण १४ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२,३०,४४,८३५/- व निव्वळ रक्कम रु.१,७४,५६,१३७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२२/१६ --** परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१२१ ते १३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील एकूण ३७ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम

रु.८,४६,९५,३९७/- व निव्वळ रक्कम रु.४,५४,४६,२७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक :१२२ / १०२८</u>**

परिमंडळ-१ मधील अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील एकूण एकूण ~~१००~~ ३७ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.~~१९,१०,६९,६८६/-~~ ८,४६,९५,३९७/- व निव्वळ रक्कम रु.~~१०,९७,९५,१७२/-~~ ४,५४,४६,२७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक १२२/१७ --</u>** परिमंडळ-२ : डी-१, डी-२, ग-दक्षिण विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३७ ते १४७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग-दक्षिण विभागातील एकूण २६ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,८७,६८,०४२/- व निव्वळ रक्कम रु.२,९०,९८,३४९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक :१२२ / १०२९</u>**

परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग-दक्षिण विभागातील एकूण २६ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,८७,६८,०४२/- व निव्वळ रक्कम रु.२,९०,९८,३४९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२२/१८ --** परिमंडळ-२ : अे,बी,सी१,सी२,सी३,डी-१,डी-२,ग-दक्षिण विभाग.

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१४९ ते १७५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-२ मधील अे,बी,सी१-२,सी३-४, डी-१,डी-२,ग-दक्षिण विभागातील एकूण १२५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२७,५६,४७,७१७/- व निव्वळ रक्कम रु.१६,१३,६०,२४५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२२ / १०३०**

परिमंडळ-२ मधील अे,बी,सी१-२,सी३-४, डी-१,डी-२,ग-दक्षिण विभागातील एकूण १२५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२७,५६,४७,७१७/- व निव्वळ रक्कम रु.१६,१३,६०,२४५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

बैठकीच्या अखेरीस मा.उप-सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

25/1/10
सचिव तथा नि.का.अ./ मुं.इ.दु.व पु.मंडळ

25/1/10
मा.उप-सभापती / मुं.इ.दु.व पु.मंडळ